# बाल्यावस्थेतील रिपू

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. १०–११–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

गतिशील जीवन आणि जीवघेणी चुरस यामुळे समाजात मनाची चंचलता अतिशय वाढली आहे. अशा परिस्थितीत मन शांत ठेवणं अशक्य होतं. मनाला योग्य नजर मिळाली आणि मनाला थोडा आवर घातला तर जीवन सुसह्य होतं. अध्यात्म–विज्ञानाने 'षड्रिपू' म्हणजे मनाचे सहा विकार मानले आहेत. बाल्यावस्थेपासूनच मनाच्या संवेदनशीलतेमुळे झालेल्या जाणिवांचे संस्कार मनावर होतात. हळूहळू या संस्कारांमुळेच मनात सौम्य विकार(रिपू) मूळ धरू लागतात. ते भावनात्मक प्रेरणेतून व्यक्त होतात. काम, क्रोध, लोभ, मोह, दंभ आणि मत्सर असे मनाचे रिपू मानले गेले आहेत. बाल्यावस्थेतच रिपूयुक्त भावनात्मक प्रेरणा कशा उत्पन्न होतात, याचं उत्तम उदाहरण म्हणजे धृव बाळाचं कथानक. हजारो वर्षांपूर्वी पुराणकाळात साहित्य लिहिलं गेलं ते जनमानसात त्याची गोडी उत्पन्न व्हावी या दृष्टीने. म्हणून ते कल्पनाविलास, उपमा, अलंकार, मुक्त आणि अतिरंजित लिहिलं गेलं. त्यामुळे त्या साहित्यातली मूलतत्त्वंच लुप्त झाली. ज्यावेळी मी नामस्मरणावर(चँटिंग) संशोधन करत होतो, त्यावेळी धृव बाळाचं कथानक संदर्भ म्हणून तपासलं. आज अमेरिकेतही चँटिंगचं प्रस्थ बरंच वाढलं आहे, कारण त्यामुळे भिरभिरणारे विचार थांबतात आणि मन शांत राहतं. आता अध्यात्म–विज्ञानदृष्ट्या धृवाचं कथानक पाहू. उत्तानपाद राजाच्या सुरुची आवडती आणि सुनीती नावडती अशा दोन राण्या होत्या. सुरुचीचा 'उत्तम' तर सुनीतीचा 'धृव'. वडिलांच्या एका मांडीवर उत्तम बसलेला पाहून धृव दुसऱ्या मांडीवर बसायला गेला. सुरुचीने त्याला खेचून ढकलून दिलं. धृव रागाने निघून गेला. उत्तानपाद या नावावरूनच तो उन्मत्त असला पाहिजे हे तुमच्या लक्षात येईल. त्याची रुची म्हणजे सुरुची त्याला आवडणारच. तर नीतिमत्ता म्हणजे सुनीती त्याला आवडणार नाही. उत्तम  हा तीन वर्षांचा असल्या कारणाने त्याच्या मनावर कोणतेही रिपूत्मक संस्कार नव्हते म्हणून तो उत्तम. 'धृव' म्हणजे धारण करणे. 'धृव' म्हणजे अढळपद धारण केलेला. आता रिपूयुक्त भावनात्मक प्रेरणेच्या दृष्टीने पाहू. उत्तमला पाहून वडिलांच्या मांडीवर बसण्याचा धृवाला 'मोह' झाला. उत्तमला बसायला मिळालं आणि मला मात्र नाही म्हणून धृवाच्या मनात उत्तमविषयी 'मत्सर' निर्माण झाला. सुरुचीने ढकललं म्हणून 'क्रोध' उत्पन्न झाला. ''मी असं अढळपद मिळवीन जिथून मला कुणीही उठवणार नाही,'' असा 'दंभ' उत्पन्न झाला. याचाच अर्थ त्याची मनाची अवस्था पूर्णत: ढळली. पण कालांतराने नामस्मरणामुळे त्याला रिपूरहित मानसिक अढळता अर्थात धृवपद प्राप्त झालं. धृव सात वर्षांचा असल्यामुळे लोभ(द्रव्यार्जन) आणि काम या रिपूंचा प्रश्नच येत नाही. धृवाप्रमाणेच आपल्यापैकी प्रत्येकाचीच मानसिक अवस्था षड्रिपूंमुळे ढळत असते, परिणामी जीवन असह्य होतं. म्हणूनच जीवन सुसह्य होण्याच्या दृष्टीने या सदरात पुढे 'रिपूंतील लक्ष्मण–रेषा' पाहू.